अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. २८/२०१८
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ६७७४ दि. १९/१०/२०१८

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२८/२०१८

**श्री शंकर तुळशीराम थोरात**
रा. ७२/८२ न. ता. वाडी,
शिवाजीनगर, पुणे ५

------------------- अपिलार्थी

विरुद्ध

१) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका

२) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
अति. महापालिका आयुक्त कार्यालय (ज), पुणे महानगरपालिका

३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
अति. महापालिका आयुक्त कार्यालय (वि), पुणे महानगरपालिका

४) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
अति. महापालिका आयुक्त कार्यालय (ई), पुणे महानगरपालिका

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्री शंकर तुळशीराम थोरात रा. ७२/८२ न. ता. वाडी, शिवाजीनगर, पुणे ५ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १९.०५.२०१८ रोजी अर्ज करून "मा. आयुक्तांच्या भेटीसंदर्भातील नागरिकांना दिलेल्या वेळे बाबत या विषयासंबंधात दि. २०.०४.२०१८ रोजी केलेल्या अर्जासंबंधात एकूण ६ मुद्द्यावर माहिती मागितली होती."

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. १८९७ दि. २३.०५.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १९.०५.२०१८ | १९.०५.२०१८ | १७/०६/२०१८ | २३/०५/२०१८ | ० |

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका** यांनी दिलेल्या उत्तरावर अपिलार्थी यांनी "विचारलेली माहिती देण्यास टाळाटाळ केली. " असे नमूद करून अपील क्र. २८/२०१८ चा अपील अर्ज दि. २६.०९.२०१८ रोजी दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २६.०९.२०१८ | २६.०९.२०१८ | २१.०६.२०१८ | नाही | नाही |

सदर प्रकरणी दि. ११.१०.२०१८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री शंकर तुळशीराम थोरात** रा. ७२/८२ न. ता. वाडी, शिवाजीनगर, पुणे ५ हे उपस्थित होते. व **श्री दयानंद सोनकांबळे** जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे मनपा, **सौ. शीतल साळुंके** जन माहिती अधिकारी, अति. महापलिका आयुक्त (वि), **श्री मिलिंद सबनीस**, जन माहिती अधिकारी, अति. महापलिका आयुक्त (ज), **श्री अजय कारंडे**, सहा. जन माहिती अधिकारी, अति. महापलिका आयुक्त (इ), हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी **श्री शंकर तुळशीराम थोरात** यांनी माझा मूळ अर्ज (दि. २०.०४.२०१८) वर काय कार्यवाही केली याबाबत मला माहिती मिळाली नाही असे नमूद केले. तर **श्री दयानंद सोनकांबळे** जन माहिती अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. १८९७ दि. २३.०५.२०१८ अन्वये अर्जास उत्तर देण्यात आलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. **जन माहिती अधिकारी, मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका** यांनी अपिलार्थी यांचा दि. २०.०४.२०१८ चा अर्ज तीनही मा. अति. महापालिका आयुक्त (वि/ज/ई) कार्यालयास वर्ग केला होता परंतु त्यावर आलेला माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आलेला अर्ज मात्र वर्ग केलेला नाही तरी यापुढे मुळ अर्ज वर्ग झाला असेल तर त्यावरील माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आलेला अर्ज वर्ग करण्याची दक्षता घ्यावी. तसेच जन माहिती अधिकारी, अति. महापालिका आयुक्त (वि) पुणे महानगरपालिका, जन माहिती अधिकारी अति. महापालिका आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका, जन माहिती अधिकारी अति. महापालिका आयुक्त (ई) पुणे महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांचे मूळ अर्जावर आणि त्यावर अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार केलेल्या अर्जाच्या अनुषगाने माहिती विनामुल्य द्यावी व तसे अपिलार्थी यांना कळवावे. अपिल क्र. २८/२०१८ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका